दि.08/12/2021

# प्रेस नोट

## पोलीस असल्याची बतावणी करणा-या तोतया पोलीसास महीला पोलीस अमलदार यांनी शिताफीने घेतले ताब्यात

दि.07/12/2021 रोजी वाशिम जिल्हा पोलीस दलात कार्यरत असलेल्या महिला पोलीस हवालदार सुषमा ज्ञानेश्वर कसले ब.नं. 741 व महिला पोलीस हवालदार पुष्पा राऊत ब.नं.65 दोन्ही नेमणुक पोलीस मुख्यालय वाशिम असे दोघी स्कुटी ने वाशिम ते मालेगाव रोडवरील चौपाल सागर येथे सामान आणणेकरीता गेले होत्या सामान खरेदी करुन परत येत असतांना सायंकाळी अंदाजे 06/00 वा चे सुमारास चौपाल सागर चे समोर रोडवरील लिंबाचे झाडाजवळ एक इसम त्यांचे स्कुटीसमोर आला व हातवारे दाखवुन त्यांना अडवुन म्हणाला की,तुमचे गाडीचे लायसन्स दाखवा,साहेब पुढे उभे आहेत असे म्हटले. त्यावर महीला पोलीस अंमलदार सुषमा कसले यांनी त्याला म्हटले की,तु कोण आहेस तेव्हा त्याने म्हटले की,मी पोलीस आहे अशी बतावणी केली. दोघी महीला पोलीस अंमलदार यांनी आम्ही पण पोलीस आहोत असे म्हटले असता नमुद आरोपी नामे-पंडीत विश्वनाथ कन्हेरकर वय अं.28 वर्ष,रा.सोंडा जि.वाशिम घाबरुन बाजुला उभी असलेल्या मोटारसायकल क्र.MH-37 E 6119 वर बसुन मोटारसायकल सुरु करीत होता त्यावेळी दोन्ही म.पो.अं.यांनी वेळीच सतर्कता दाखवुन अंत्यत शिताफीने नमुद आरोपी यास पकडले. आरोपी याने महीला पोलीस अंमलदार यांचे स्कुटीला हातवारे दाखवून अडवणुक करुन पोलीस असल्याची बतावणी केल्याप्रकरणी दिलेल्या फिर्यादवरुन पोस्टे वाशिमग्रामिण येथे नमुद आरोपी विरुध्द अप क्र. 0405/2021 कलम 170,341 भा.दं.वि.प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस ताब्यात घेण्यात आले असुन तपास सुरु आहे.

नमुद दोन्ही महीला पोलीस अमलदार यांनी वेळीच सतर्कता दाखवुन अंत्यत शिताफीने नमुद आरोपी यास ताब्यात घेवुन पोलीस स्टेशन ला आणले महीला पोलीसानी केलेल्या धाडसी कार्यवाहीमुळे दोन्ही महीला पोलीस अमलदार यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

मा.श्री.बच्चन सिंह साहेब,पोलीस अधिक्षक वाशिम,मा.श्री.गोरख भामरे अपर पोलीस अधिक्षक वाशिम, मा.श्री यशवंत केडगे उपविभागीय पोलीस अधिकारी वाशिम विभाग,यांचे मार्गदर्शनाखाली .श्री विनोंद झळके सपोनी ठाणेदार पो.स्टे वाशिम ग्रामिण यांचे पथका मार्फत गुन्ह्याचा पुढील तपास करण्यात येत आहे.

ठाणेदार
पो.स्टे.वाशिम(ग्रा.)

Scanned with CamScanner